# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/ 1274 दिनांक : ०८.०७.२०२०

**तात्काळ /अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत...**

संदर्भ : - मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/४६२५ दि. ०७.०७.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची विहित वेळेत पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि वेळोवेळी मुदतवाढ देऊनही. दि. ६.७.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार अद्यापही एकूण ८७७ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तसेच कोरोना विषाणु (कोविड १९) मुळे उद्भवलेली राज्यातील वास्तविक परिस्थिती विचारात घेऊन विद्यार्थी हिताच्या दृष्टीने महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार, **मा . संचालनालयाच्या संदर्भिय पत्रानुसार, सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १७ जुलै, २०२० अशी अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था स्तरावरुन अर्जांची पडताळणी करणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही** परिस्थितीत मुदतवाढ देणार नाही. सदरहू मुदतीनंतर प्रलंबित राहिलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत.

तरी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था स्तरावर प्रलंबित रहाणार नाहीत. याची गांभीर्याने दक्षता घ्यावी. दि.१७ जुलै, २०२० नंतर अर्ज प्रलंबित राहील्यामुळे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याबाबत सर्वस्वी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठांचे कुलसचिव जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.